शैक्षणिक संदर्भ अंक १२० ऑक्टो-नोव्हे २०१९

# वाचन विकसन... भाग १

लेखक : कृतिका बुरघाटे

# वाचन विकसन... भाग १

## लेखक : कृतिका बुरघाटे

शिक्षणाचे वातावरण सशक्त करण्यासाठी, चांगल्या शिक्षकांना नावं ठेवण्याऐवजी त्यांना दर्जेदार इनपुट्स देऊन, यशाची चव चाखलेली उदाहरणे समोर ठेवून, सतत बळ दिल्यास, उमेद जागवल्यास चांगुलपणाचा संसर्ग (सर्कल ऑफ इन्फुएन्स) वाढत जाईल व अपेक्षित परिणाम मिळेल. त्यासाठी स्पर्धेचे वातावरण निर्माण होणे गरजेचे वाटते. मी त्या शिक्षकांपेक्षा सरस करू शकतो ही भावना निर्माण व्हायला हवी. त्यासाठी सरस कार्य केलेल्या शिक्षकांच्या कार्याचा प्रसार होणे गरजेचे आहे. शिक्षकांनी स्वतः राबविलेले विविध उपक्रम शेअर केल्यामुळे आणि शिक्षक करत असलेल्या प्रयत्नांमुळे विद्यार्थी विकासाच्या उपक्रमांसाठी चांगले वातावरण तयार होईल. विधायक कामांत चढाओढ चांगली असते.

क्रीडास्पर्धा, सांस्कृतिक स्पर्धा आणि विविध स्पर्धेत दिसून येणारी ही चढाओढ शैक्षणिक चढाओढीकडे वळविण्यासाठी जिल्हा पातळीवर उपक्रमांचे आयोजन होणे अगत्याचे वाटत आहे. अस्खलितपणे वाचनाचे नियम पाळून वाचन करणारे इयत्ता १ली ते ८वीचे विद्यार्थी अध्ययन स्तरात जरी सरासरी ७८% दिसत असले तरी वास्तवात हे प्रमाण ५०% पेक्षा खाली आढळते. मुलांना वाचन शिकविणे हे कठीण कार्य ठरत आहे. पहिलीच्या, दुसरीच्या वर्गातील

मुले त्यांच्या पातळीवरील मजकूर समजपूर्वक वाचू शकतात. तिसरीच्या पुढे हे प्रमाण अधिकाधिक वाढण्यापेक्षा कमी होत जाते. वाचन करताना केवळ वरवर वाचल्याने बोध होणारा वाक्यार्थ असलेला मजकूर मुले वाचतात आणि समजून घेतात. वरच्या वर्गात गेल्यावर केवळ वाक्यार्थावर मजकूर आधारित रहात नाही. त्यात व्यंगार्थ, लक्षणार्थ, संकेतार्थ असतात. मुले हे समजून घेण्यात कमी पडत आहेत. वाक्यातील वाक्प्रचार, म्हणी, शब्द मुलांच्या व्यवहारात रुळलेले नाहीत. त्यांच्या शब्दसंपत्तीत वाढ तर झालेली नाहीच, पण ती वाढ होण्याची संधी कुठे फारशी मिळताना दिसली नाही. नॅशनल अचिव्हमेंट सर्व्हेच्या परीक्षेत आमची मुले खरंच उतरू शकतील काय हा प्रश्न सोडविण्यासाठी काही शाळांमध्ये प्रात्यक्षिक करून बघणे आणि वास्तविकता काय आहे हे पडताळणे ह्या उद्देशाने भेटी दिल्या.

केवळ मूल पडताळणे हा उद्देश ठेवून गेले तर मुलांच्याच अडचणी दिसू लागतात. पण ह्या अडचणी का निर्माण झाल्या ह्याची पडताळणी मात्र होत नाही. ती झाली नाही तर त्या शाळाभेटीला, वर्गभेटीला काही पूर्णत्व येत नाही असे मला जाणवले. शिक्षक वर्गात कोणत्या प्रकारे शिकवीत आहेत, त्यांच्या शिकविण्यात काय अडचणी आहेत, कमतरता आहेत, त्या विषयाची त्यांची समज, त्या विषयाला हाताळण्याचे त्यांचे कसब हे सगळे लक्षात घेणे महत्त्वाचे ठरते. मुलांना येणाऱ्या अडचणी ह्या प्रामुख्याने त्या घटकाबद्दल त्याला न झालेले आकलन, त्यातील सुटलेले बारकावे, त्याच्या अस्पष्ट संकल्पना, मिळालेली अपूर्ण माहिती, न जुळलेल्या कड्या आणि बरेच काही अशा स्वरूपाच्या असतात.



प्रत्येक वर्गात वाचन करणारी किमान ६०% मुले आहेत परंतू आकलनपूर्ण वाचन करणारी निवडली तर १७% च्या पुढे मला हे प्रमाण जाताना दिसत नाही. हे प्रमाण वर्गानुसार वाचन पातळी पाहून ठरवले आहे. ('असर' च्या निकषावर नाही.) मुले वाचलेल्या मजकुराचे आकलन करण्यास कमी का पडतात? ह्या प्रश्नाचा गांभीर्याने विचार करायला सुरुवात केली, अध्यापनाची आणि अध्ययनाची, सरावाची आणि संधीची निरीक्षणे नोंदविली.

फळ्यावर मजकूर लिहून दिला, मनात वाचायला लावला आणि काय वाचले ते सांगायला लावले, तर मुले बऱ्यापैकी गोंधळली. पहिलं वाक्य जसेच्या तसे सांगण्याचा प्रयास काही मुलांनी केला. पण ते अपेक्षित नव्हते. पुन्हा एकदा वाचा आणि मग सांगा अशी सूचना केल्यावर आता पुढे प्रश्न विचारणार आहेत ह्या दृष्टीने मुलांनी एक दोन वाक्य पाठ करण्याचा प्रयास केलेला दिसला. पाठांतर करून सांगणे अपेक्षित नव्हते. मग म्हटलं कुणीतरी जोरात वाचा. मग मात्र मुलांना ते काय समजलं हे सांगता आलं. म्हणजे ऐकून समजणे आणि समजलेले सांगणे ही क्षमता मुलांमध्ये आहे. आणखी वरच्या वर्गात हाच प्रयोग थोडा काठिण्य पातळी वाढवून केला. मजकूर फळ्यावर लिहून दिला आणि 'मनात वाचा' अशी सूचना केली. इथेही 'वाचा' ह्या सूचनेवरून किती मुलांनी वाचले हे स्पष्ट होत नाही. पण पुढे 'आता काय वाचले ते लिहा' अशी सूचना केल्यावर पार धांदल उडाली. काहींनी पहिली ओळ लिहिण्याचा प्रयास केला.

तोही तोकडा होता. मग म्हटले जे जे शब्द आठवतात ते लिहा फक्त. ७/८ शब्दांपलिकडे मुले गेली नाहीत. मग पुन्हा वाचायला लावले. आता मुलांना माहीत होते की लिहायला लावणार. त्यांनी लक्षपूर्वक (काही लेखन करता आले पाहिजे या दृष्टीकोनातून) वाचायला/पाठ करायला सुरुवात केली. असे पाठ करून लिहिणे अपेक्षित नव्हते. काय समजले ते आपल्या भाषेत लिहिणे हा मुद्दा होता. समजले नाही हा एक मुद्दा तर दिसलाच, पण मुलांना समजलेले क्रमाने शब्द जुळवत लिहिणे जमत नसल्याची दुसरी बाब देखील समोर आली. समजपूर्वक वाचन मुलांना का जमत नाही हे पडताळून पाहण्यासाठी काही प्रयोग केले.

मुलांचे प्रकट वाचन घेतले. ज्या मुलांनी मोठ्याने आणि अस्खलितपणे वाचले त्यांना लहान लहान मजकूर समजत आहे असे आढळून आले. (पण मनातल्या मनात वाचून ते का बरे समजले नाही ह्याचं उत्तर नाही सापडलं. कदाचित त्यांनी वाचनच केले नसावे.) पण थोडी लांबी वाढली किंवा उताऱ्यातील मजकुराने जरासे वळण घेतले की काम पुन्हा अवघड होऊन बसे. ह्या मुद्याचा विचार केला आणि शिक्षकांच्या वर्गातील प्रकट वाचनाचे निरीक्षण केले. शिक्षक वर्गात पाठ शिकवीत असताना एक एक शब्द वाचत आणि मुले त्याचा पुनरुच्चार करत असल्याचे आढळले. म्हणजे पाठाचे आदर्श वाचन झालेच नाही. सलग वाक्यवाचन, चढउतार, व्याकरणाचे नियम ह्यानुसार तर ऐकण्याची संधीच दिली नाही. म्हणजे वाचन कसे असावे हे मुलांनी अनुभवलेले नाही. काही मुले धडाधड वाचत होती. पण व्याकरणाच्या नियमांचा त्यात पत्ता नव्हता. आता एक मुख्य मुद्दा हाती आला. शिक्षक नवा पाठ कसा सुरू करतात हे पाठ निरीक्षणातून समजले आणि ही अडचण लक्षात आली.

इयत्ता ४थी च्या वर्गात 'मायेची पाखर' पाठ सुरु होणार होता. मी शिक्षिकेला थांबायला सांगितले आणि मुलांना पहिला उतारा मनातल्या मनात वाचायला सांगितले. पाच-दहा मिनिटे वेळ दिला. मुले हळू आवाजात वाचन करीत होती. त्यामुळे मला कळून आले कुणाकुणाला वाचता येते ते. वाचन झाल्यावर मी मुलांना सांगितले, "जे शब्द नवे आहेत किंवा तुम्हाला ज्या शब्दाचा अर्थ माहीत नाही ते शब्द सांगा. आपण फळयावर लिहू."

सुरुवातीला आलेले शब्द - आदर, समाधान, संस्था, आग्रह.

नंतर येऊ लागलेले शब्द - अत्यंत, पुण्याला, सातारला.

शेवटी शेवटी आलेले शब्द - यांच्याबद्दल, त्यांच्याकडे, त्यांची, अंधार पडला, म्हणायचे.

यावरून नवीनच बाब लक्षात आली. शिक्षक गृहीत धरतात मुलांना हे सगळे शब्द कळतात म्हणून. पुण्याला, सातारला, हे शब्द त्यांच्यासाठी खरोखरच नवे आहेत, पुणे शहराचे नाव माहीत असले तरी पुण्याला म्हणजे पुणे शहरात हे त्यांना वाचताना कळत नाही.(डिकोडिंगची समस्या आहे. मुलांना वाचता आले पण अर्थ नाही लावता आला.) शिवाय तिसऱ्या टप्प्यात आलेले शब्द बघितले तर मुलांची नेमकी अडचण शब्दात आहे हे कळते. वाक्यात आलेले हे शब्द आणि त्याच्याशी निगडीत असलेले दुसरे शब्द यांचा अर्थबोध होत नाही. म्हणून एका वाक्याचा दुसऱ्या वाक्याशी, दुसऱ्याचा तिसऱ्याशी संबंध जोडता येत नाही आणि आपण म्हणतो आकलनपूर्वक वाचन होत नाही. ही दुसऱ्या आणि तिसऱ्या गटातील मुले वाचन, आकलन, अर्थबोध यात मागे राहतात. फार महत्वाचा मुद्दा हाती आला होता.

पहिल्या गटातील मुले वाचनात मागे का पडतात हा प्रश्न आता उत्सुकता वाढवीत होता.

मुले वाचन करीत नाहीत हे सगळे म्हणतात. वाचन ही कला आहे, छंद आहे, जगातील कोणत्याही विषयावर अभ्यास करण्यासाठी वाचन ही मूलभूत गरज आहे. ही जाणीव निर्माण करणे, तिच्या पोषणासाठी वातावरण, संधी निर्माण करणे आवश्यक आहे. मुलांमध्ये ही जाणीव निर्माण होण्यासाठी इथे कोणत्या संधी पुरविल्या गेल्या? मुलांसमोर वाचन संस्कृती ठेवण्याचे कितीसे काम सुरू आहे हे पडताळणे गरजेचे  वाटले. ह्यासाठी दुसरा शोध प्रयोग केला.

मुलांसमोर शिक्षकांचे वाचन किती सुरु असते हे बघितले. मुलांना बोलते करीत संवाद साधला. तुम्ही कोणकोणती कामे करता याचा तक्ता (माइंड मॅप) करू या. मुलांनी सांगितले ते ते फळ्यावर मी लिहिले. त्यात आम्ही धडा वाचतो. वाचनालयातील पुस्तक वाचतो हे होतं. मग दुसऱ्या फळ्यावर तुमचे शिक्षक कोणकोणती कामे करताना तुम्हाला दिसतात, हा प्रश्न केला आणि तक्ता  करायला घेतला. बापरे! फळा भरला. मुलांचे सांगणे सुरूच होते. पण या तक्त्यात कुठेही 'वाचन करतात' हा शब्द आला नाही. शिक्षक करतात ती सगळी कामे मुलांना १००% माहीत आहेत. ती कामे ते शिक्षक करताना दिसतात म्हणून माहीत आहेत. पण खरोखरच मुलांना शिक्षक वाचन करताना दिसत नाहीत.

'मोठी माणसे वाचन करीत आहेत. वाचन ही नित्याची बाब आहे. ती इतर दैनंदिन कामांपैकी एक आहे', असे आदर्श असे स्वरूप किंवा चित्र आपल्याकडे उपलब्ध नाही. गावातील घरात असे चित्र पालकांच्या परिस्थितीने शक्य होत नाही, आणि शाळेत, गावातील

चावडीवर, कट्ट्यावर, समूहात, शाळेबाहेरही असे दृश्य मुलांना दिसत नाही. शिक्षकांची वाचन संपदा समृद्ध नाही. शिक्षणावरील विचार, कार्य, प्रयोग, संशोधन यावर सातत्याने वाचन गरजेचे आहे. बहुतांशी शिक्षक 'आपली आवड' या प्रश्नाचे उत्तर 'वाचन' असे सांगतात. अर्थात वर्तमानपत्र सगळेच वाचतात यात शंका नाहीच. पण त्याव्यतिरिक्त या आठवड्यातील वाचन सांगा ह्या प्रश्नावर 'तोतोचान' हे एकच नाव ऐकायला येते.



आभा भागवतांच्या चित्रांचा उल्लेख मला या ठिकाणी आवर्जून करावासा वाटतो. त्यांनी आपल्या चित्रात वाचन संस्कृतीचा प्रसार केलेला आहे. निसर्गातील प्रत्येक जीव वाचण्यात गुंतलेला दिसतो त्यांच्या चित्रात. झाडावर, पाना- फुलांवर, झोपडीत, माळरानावर, खिडकीत, दरवाज्यावर, भिंतीवर, कपाटावर सगळीकडे वाचन सुरु असते तिथे. ह्या चित्रांमुळे केवळ भिंती आकर्षक दिसत नाहीत तर ही चित्र पाहून शाळकरी मुलेच नाही तर गावातील इतर लोकांनाही वाचनाचे वेड लागू शकते. (गाव तेथे वाचनालय ही चळवळ व्हायला पाहिजे असे आपण ऐकतो; अनेकांनी त्या कामाला सुरुवात देखील केली आहे. ही स्तुत्य बाब आहे.)

प्रत्येक शाळेत आता काही किमान पुस्तके उपलब्ध झालेली आहेत. त्यांच्या उपयोजनाबद्दल मात्र निराशामय वातावरण दिसले. पुस्तके वाटून द्यायची, वाचा म्हणायचे आणि गोळा करून ठेवायचे. हे असले वाचन मुलांना वाचनाची गोडी कशी लावू शकेल? एकतर

आकर्षक पुस्तकांची कमतरता, पुस्तकांच्या किमती आणि देणगीदारांची उणीव यामुळे मुलांना हवी तशी पुस्तके वाचायला मिळत नसल्याची खंत मुले बोलून  दाखवितात. वाचनालयातील कोणती पुस्तके तुम्हाला आवडतात असे विचारले तर बहुतेक मुले (१ली ते ७वी ची) कथांची लहान लहान पुस्तके हेच सांगतात. ह्या पुस्तकांची शाळेत कमतरता आहे असे नाही.

जितकी पुस्तके उपलब्ध आहेत, तितकी तरी किमान प्रत्येकाकडून वाचून घेतली गेली काय हा प्रश्न आहे? शाळेत पन्नास (गोष्टींची) पुस्तके आहेत म्हटल्यावर प्रत्येक मुलाने ती पन्नास पुस्तके वाचली आहेत काय? नसतील तर पुन्हा कशाला हवीत पुस्तके? जितकी मुले वर्गात असतात तितकी पुस्तके असली तरी प्रत्येक मूल प्रत्येक पुस्तक वाचू शकेल याचे नियोजन शिक्षकाच्या हातात असते. परंतु हे घडताना दिसले नाही. वाचन विकसनाच्या संधी उपलब्ध होत नाहीत म्हणूनच पहिल्या प्रयोगात वाचनात पुढे असलेली मुले हळूहळू मागे पडू लागतात.

दोन मुख्य कारणांचा शोध लागला. त्यावर उपायही दिले पाहिजेत. माझ्या वर्गातील वाचनावर झालेले काही प्रयोग मी इथे थोडक्यात मांडणार आहे.

§§§

---

लेखक : **कृतिका बुरघाटे,** भाषा शिक्षिका, जि.प.उच्च प्राथमिक शाळा, मसाळा (तुकुम), केंद्र-दुर्गापूर, प.स. चंद्रपूर येथे सध्या कार्यरत, विषय सहायक :  इंग्रजी, DIECPD, चंद्रपूर.

इमेल : Krutikaburghate@gmail.com